॥ श्रीः ॥

# ॥ काळसर्पशांति विधानाच्या विश्वासार्हतेबद्दल.. ॥

## (असाही एक विचार )

**पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं नवमित्यवद्यम् ।**

( जुने आहे म्हणून ते सर्वच योग्य नसते व नवे आहे म्हणून ते सर्वच अयोग्यही नसते .)

- कालिदास

'झी २४ तास' वाहिनीवरील रोखठोक कार्यक्रमातील चर्चेत घेतलेला ' नारायण नागबली व काळसर्प हे विधी म्हणजे थोतांड आहे का ?' हा विषय गेले काही दिवस पुरोहितांच्या व धार्मिक जनतेच्या चर्चेत आहे. 'नारायण नागबली' हा विधी थोतांड नसून त्यास आश्वलायन, बौधायन यांपासून धर्मसिंधू, निर्णयसिंधू, संस्कार रत्नमाला, विधानमाला तसेच ऋग्वेदीय ब्रह्मकर्म समुच्चय , उत्तरनारायणभट्टी (अंत्येष्टी) अशा अनेक ग्रंथांचा आधार आहे हे पूर्वीच्या लेखात सांगितले होते. त्या लेखात 'रोखठोक' कार्यक्रमातील विधानांचेच परीक्षण व वास्तव लिहिले होते. तरीही, काहींच्या मनात एक प्रश्न होताच तो म्हणजे ' काळसर्प शांतीच्या विधानाला काही प्राचीन अथवा अर्वाचीन ग्रंथांचा आधार आहे का ?' ही शंका येणे अयोग्य नव्हते कारण याज्ञिकांमध्ये प्रसिद्ध अशा वर उल्लेख केलेल्या ग्रंथात 'काळसर्प शांती' या नावाचा प्रयोग कुणीच दिलेला नाही. त्यामुळे काळसर्पशांती बाबतीत निरसन करणेसुद्धा तितकेच गरजेचे वाटल्याने हे विचार तुमच्यापुढे मांडतो आहे. विशेषतः पुरोहितांनी व संबंधितांनी या लेखाचा अवश्य विचार करावा.

पहिला महत्वाचा मुद्दा म्हणजे काही कुंडलीत आढळणाऱ्या काळसर्प योगाला ज्योतिषग्रंथांचा आधार आहे का ? खरे तर, माझे फलज्योतिषाचे ज्ञान तुलनेनी अल्प त्यात असे संशोधन करण्याएवढ्या प्रज्ञेची सुद्धा कमतरता अशा परिस्थितीत केवळ काही

pankajjoshiguruji@gmail.com  संपर्क :- (022) 24311409

हितचिंतकांच्या सांगण्यावरून व अशा शांती करणाऱ्या पुरोहितांना 'गुन्हेगार' म्हणण्याचा गुन्हा यापुढे कोणीही करू नये या सद्धेतूनेच एवढे मोठ्ठे धाडस करीत आहे.

लेखाच्या शीर्षकाखाली असलेल्या कालिदासोक्तीचा अर्थ यासंबंधाने लक्ष्यात घेण्यासारखा आहे. कविकुलगुरू कालिदास म्हणतात, एकादि गोष्ट मग ते काव्य असो किंवा अन्य काही, केवळ तिचे पुराणत्व(प्राचीनत्व) या एकाच कारणास्तव ती स्वीकार्य असते का ? तसेच एकादी गोष्ट नवीन आहे या एकाच कारणास्तव ती (जुन्या काळाच्या तशाच गोष्टीच्या तुलनेनी ) अस्वीकार्य अथवा कमी प्रतीची ठरते का ? दोनही प्रश्नांची उत्तरे ' नाही' अशीच द्यावी लागतील. ( कालिदासांनी प्रश्न विचारला नाही त्यांनी थेट 'रोखठोक' विधानच केले आहे. वाचकांना समजावे म्हणून मी ते अश्या पद्धतीने मांडले आहे.) कालिदासाचा रोख तत्कालीन समाजाच्या विचारसरणीवर होता. जुन्या कवींचे काव्य ते अत्युत्कृष्ट व (कालिदासासारखे) नवखे कवी म्हणजे अतिनिकृष्ट (आजच्या तरुणाईच्या भाषेत 'पानी कम'.) असे समजणाऱ्यांना कालिदास (उत्तरार्धात) म्हणतात की जे सदसद्विवेकबुद्धीने युक्त असे विद्वान ते मात्र या दोन्हींची ( जुन्या व नव्याची) परीक्षा करतात आणि योग्य त्याचीच निवड करतात. एवढे मोठ्ठे प्रवचन करायचा उद्देश असा की एकादे जुन्यात जुने धर्मकृत्यसंबंधी विधान मिळाले परंतु, जर ते विधान प्राप्त परिस्थितीशी सुसंबद्ध नसेल अथवा आवश्यकता नसेल व त्यामुळे ते विधान करून अपेक्षित लाभ सुद्धा नसेल तरीसुद्धा ते जुने आहे म्हणून त्याचाच अट्टाहास करायचा ? का तुलनेनी एकादे नवे विधान उपलब्ध असल्यास (व ते याज्ञिकशास्त्राच्या परिभाषेतसुद्धा चपखल बसत असल्यास) ते स्वीकारायचे ? काळसर्प शांतीचे विधान जर आश्वलायन, बौधायन आदींनी दिलेले नसले तर तो योग ज्यांच्या कुंडलीत आहे त्यांनी जन्मभर नशिबालाच दोष देत बसायचे का ? एक पुरोहित म्हणून यजमानांच्या कुंडलीत असलेले त्रासदायक योग परिहार करण्याची संधी याज्ञिकशास्त्रात असूनही 'तुम्ही आणि तुमचे नशीब' असेच आम्ही म्हणायचे का ? यजमानांच्या सुखात तसेच दुःखात सुद्धा त्यांना सहाय्य करायचे सोडून " नाही हो ! आमच्या ग्रंथांमध्ये तुमच्या कुंडलीतील काळसर्प योगावर काही उपाय लिहिलाच नाही. मग आम्ही तरी काय करणार ? " असे म्हणायचे ?

आमचा जन्मच जर यजन याजनादि कर्माकरिता झाला आहे, तर या दुर्योगांवरील शास्त्रकक्षेत बसू शकणाऱ्या परंतु आत्तापर्यंत विधान उपलब्ध नसलेल्या शांती करण्याकरिता आश्वलायन, बौधायनादि आचार्यांच्या पुनर्जन्माची किंवा त्यांच्या ग्रंथांच्या पुनर्रचनेची वाट बघत बसणे हि खरी अंधश्रद्धा म्हटली पाहिजे.

आम्हा पुरोहितांना वेळोवेळी मार्गदर्शन करणारे असे ऋषितुल्य 'वैदिक-शास्त्री-पंडित' आजही उपलब्ध असताना त्यांच्या सहाय्याने जर एकाद्या **'सुयोग्य'** पुरोहिताने पुढाकार घेऊन 'काळसर्प शांति विधान' संकलित केले तर त्यास कोणतेही पातक लागणार नाहीच परंतु, समस्त जनता जनार्दनाचे त्रास, अडचणी, क्लेश कमी होण्याकरिता महत्परिश्रम केल्याबद्दल सर्वांतर्यामि परमात्मा त्यास शुभाशीर्वादच देईल असे मला वाटते. असे अनुपलब्ध प्रयोग तयार करण्याचे महत्कार्य याअगोदरही झाले आहे व यापुढेही होत राहीलच. कित्येक पुरोहितांचा व धार्मिक जनतेचा कदाचित असा गैरसमज झाला असेल की " काळसर्प शांतीचा प्राचीन ज्योतिषविषयक व शांतिप्रयोग संबंधित ग्रंथात उल्लेख नसल्यामुळे यापुढील काळात काळसर्प शांती करणे सशास्त्र आहे का नाही हे कसे ठरवायचे ? " त्यांना सांगू इच्छितो की, माझ्याप्रमाणेच अनेक जिज्ञासू पुरोहित अनेक ठिकाणांहून विविध ज्येष्ठ शास्त्रीपंडितांशी संपर्क साधून काळसर्प शांतीच्या विधानांचे जुन्यात जुने व अधिकृत संदर्भ जनतेपुढे आणण्याच्या प्रयत्नात आहेत, पण तोपर्यंत ' काळसर्प हा गेल्या ५० वर्षात सुरु झालेला विधि आहे.' हे सोमण प्रभृतींचे विधान क्षणभराकरिता मान्य करून सुद्धा, या शांतीच्या प्रचलित विधानास अशास्त्रीय सिद्ध करता येणार नाही. ते कसे व का हे पुढे सांगतो आहे. **(या लेखाचा अर्थ 'काळसर्प शांतीविधान हे फार जुने नाही असे आम्ही समजत आहोत' असा गैरसमज कुणी करून घेऊ नये व तसा अपप्रचारही कृपया करू नये. )**

(१) वेदकाळात अनेक ऋषि वेगवेगळ्या कालखंडात होऊन गेले. जुन्यांनी नव्यांना कधीच तुच्छतेनी वागविले नाही. व नव्या ऋषींनीही जुन्यांचा आदर ठेवल्याचे संदर्भ आहेत. उदा. बहुतेकांना ज्ञात असलेला ऋक्संहितेतील दुसराच मंत्र ( अग्निः पूर्वेभिर्ऋषिभिरीड्यो नूतनैरुत ।) यात पूर्वेभिः व नूतनैः या पदांनी ऋषींमध्येही जुने व नवे असे ऋषि होते व त्यात

pankajjoshiguruji@gmail.com  संपर्क :- (022) 24311409

आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. विश्वामित्राच्या कुळात कुशिक – गाथिन – विश्वामित्र – मधुच्छंद – जेता अशा पाच पिढ्यांच्या ऋचा ऋक्संहितेत उपलब्ध आहेत. तेव्हा , प्राचीन ऋषींनी सुद्धा नव्या पिढीतल्या ऋषींच्या ऋचांना कमी लेखले नाहीच पण एक लक्ष्यात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे मधुच्छंदासारख्या ऋषींच्या ऋचा ऋक्संहितेच्या सुरवातीस ठेवण्याचा मनाचा मोठेपणा, उदारपणा सुद्धा दाखविला.

(२) एकाद्या गोष्टीचे प्रामाण्य श्रुति, स्मृति, ग्रंथ, शब्द,तर्क,अनुमान या व अशा साधनांनी ठरविता येते. परंतु, एवढी विविधता माहिती नसलेले विचारवंत केवळ ग्रंथप्रामाण्यास मानतात व तेच एक विश्वासाचे साधन आहे असे समजतात. तेव्हा ग्रंथप्रामाण्य (सध्या उपलब्ध) नसतानाही एकादा विधी सशास्त्र कसा ठरू शकतो हे समजाविण्याकरिताच हा प्रयत्न आहे.

(३) हिंदू धर्मावर नेहमीच शत्रूंकडून आक्रमणे झाली आहेत. अशा आक्रमणांमध्ये हिंदूंच्या स्थावर मालमत्तेची, मनुष्यांची जशी हानी झाली आहे तशीच काही विशिष्ट धर्मियांच्या आक्रमणात अनेक दिवस जळत असलेल्या प्राचीन ग्रंथांच्या नाशामुळे हिंदूंच्या ज्ञानाचा ठेवा मोठ्या प्रमाणात नष्ट झाला आहे. त्यामुळे सध्या उपलब्ध आहे तेवढेच प्राचीन आहे असे समजणे योग्य नव्हे. या नष्ट झालेल्या ग्रंथापैकी एकाद्या ग्रंथात काळसर्पयोग असू शकतो. ( एकच उदाहरण देतो. ऋग्वेदप्रातिशाख्यात १६ व्या पटलातील १० व्या श्लोकात ६-६ अक्षरांच्या ४ पादानी होणाऱ्या गायत्री छंदाच्या उदाहरणार्थ एक ऋचा दिली आहे. परंतु, ही ऋचा ऋग्वेदाच्या सांप्रत उपलब्ध शाकल संहितेत नाही. मग महर्षि शौनकांनी ती उगाचच दिली असेल का ? असे म्हणणेही योग्य नाही. ‘शाकल’ संहितेखेरीज अन्य संहितेपैकी एकातरी संहितेत ती असणारच असे मानल्याशिवाय गत्यंतर नाही. अशी आणखीही उदाहरणे देता येतील, पण विस्तारभयास्तव इतकेच पुरे.)

(४) स्वयंप्रज्ञा असल्याचे समजत असल्यामुळे ग्रंथप्रामाण्यास न मानणारे लोक सुद्धा जेव्हा ग्रंथांचा आधार दाखवा असे सांगू लागतात तेव्हा त्यांना सनातन धर्मशास्त्रप्रमाणित ग्रंथांमधील अन्य विषय सुद्धा मान्य असतात का ? असे विचारा. अन्य विषय कोणते ? तर हे

धर्मसिंधू, निर्णयसिंधू, संस्कार रत्नमाला इ. प्रमाण ग्रंथ चातुर्वर्ण्य मान्य करूनच लिहिले आहेत. बरे ! हे चातुर्वर्ण्य म्हणजे अंगातील छंद,कला,गुण व स्वेच्छेनी स्विकारलेले कर्म यानुसार ठरत नसून ‘ मातेचा वर्ण व पित्याचा वर्ण जो असेल त्याला अनुसरून संततीचा वर्ण ठरत असतो. या वर्णास अनुसरूनच त्याचे संस्कार, कर्म, वृत्ति इ. ठरत असते.’ या सिद्धांतावर आधारलेले आहे. (सर्वेषां जन्मना जातिः) वर्ण म्हणजे ब्राह्मण,क्षत्रिय,वैश्य इ. ; गोरा, सावळा, गव्हाळ इ. नव्हे. सांप्रत प्रचारात असलेला व सद्यकाळात खऱ्या अर्थाने थोतांड असलेला ‘कुमारिकांचा उपनयनविधि’ यापैकी कोणत्याही ग्रंथात नाही. तेव्हा त्यासही मान्यता नाही असे हे ‘ग्रंथप्रामाण्य’ मानणारे मान्य करणार का ? प्रथम रजोदर्शन होण्यापूर्वी कन्येचा विवाह करावा अशा मताने या ग्रंथांमधील विवाहादि संस्कार सांगितले आहेत तेव्हा असे विवाह हे ‘ग्रंथप्रामाण्य’ मानणारे मान्य करणार का ? सगोत्र विवाहास या ग्रंथांची मान्यता नाही तेव्हा असे सगोत्रविवाह हे ‘ग्रंथप्रामाण्य’ मानणारे अमान्य करणार का ? पतीच्या निधनानंतर सहगमन अथवा शास्त्रप्रोक्त विधवावस्थेतील आचारपालन हे दोनच मार्ग हे ‘ग्रंथप्रामाण्य’ मानणारे मान्य करणार का ? हे आणि यासारखे प्रश्न जर मान्य करायचे नसतील तर केवळ काळसर्पाकरिताच ग्रंथप्रामाण्याचा अट्टाहास का म्हणून ? आहे का उत्तर ?

(५) एकीकडे ‘टेक्नो सॅव्ही’, ‘अपडेट’ ‘वैज्ञानिक दृष्टी’चे असले पाहिजे असे म्हणणाऱ्या सुधारकांना धर्मातील ( कर्मकांड, ज्योतिष इ. मधील) नवीन कृति म्हणजेच सद्यकालाच्या आवश्यकतेनुसार लोकोपयोगी पण धर्मशास्त्राच्या नियमाच्या चौकटीत राहून एकदा नवीन प्रयोग कुणी रचणे अथवा ज्योतिषातील स्वतःच्या अनुभव, निरीक्षण, संशोधन यानुसार विशिष्ट ग्रहस्थितीने सूचक एकदा योग जातकास सांगणे हे का मान्य होत नाही ? पुरोहितांमध्ये जुन्या पिढीत जसे होते तसेच नव्या पिढीतही संशोधक प्रवृत्तीचे व प्रचंड ज्ञानभांडार असलेले पुरोहित आजही कार्यरत आहेत. ज्योतिषांमध्येही असतीलच. अशांनी कोणत्याच अर्थप्राप्तीची, मानसन्मानाची व प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता संशोधन करीत राहून एकाद्या वैज्ञानिकाप्रमाणे, शास्त्रज्ञाप्रमाणे लोकहितार्थ जे नवेनवे संशोधन केले आहे ते सर्व निरर्थक, निष्फळ अथवा निराधार म्हणणे हा त्यांच्या बौद्धिक श्रमाचा अपमानच नव्हे तर

काय ? सर्व पंचांगकर्त्यांमध्ये एकवाक्यता नाही हे जरी खरे असले तरी त्यामुळे आपल्या पंचांगाशिवाय अन्य पंचांगे थोतांड ठरू शकत नाहीत. उदा. आम्ही दाते पंचांग वापरतो म्हणून आम्ही टिळक, केतकर, मोडक ते अगदी नव्या पिढीच्या देशपांडेंच्या पंचांगांना ‘थोतांड’ म्हणणार नाही. एकतर आमचा तो अधिकार नाही व त्यातून धर्महिताचे काहीच साधले जाणार नाही. उपरोक्त प्रत्येकांनी प्रचंड संशोधन करूनच वेदपुरुषाच्या चक्षूंना अधिकाधिक तेजस्वी बनविले आहे. नवीनच आले आहे म्हणून एकादे पंचांग उपेक्षणीय नसते. थोतांड नसते. तेव्हा, कर्मकांडातील संशोधन व नव्या प्रयोगांचेही ज्योतिषी व पंचांगकर्त्यांनी स्वागतच केले पाहिजे नाही का ?

(६) वेद जरी अपौरुषेय असले तरी उपरोक्त आश्वलायन, शौनकादि सूत्रकार अथवा आचार्य यांची सूत्रे ही तर अपौरुषेय नाहीत ना ? निदान पूर्वमीमांसेचा तरी सिद्धांत हेच सांगतो आहे. ( **कल्पसूत्राणामस्वतः प्रामाण्याधिकरणम्** – पूर्व मीमांसा १-३ अधिकरण ७ वे ) पण गृह्य व श्रौतसूत्रांचा आधार घेतल्याशिवाय गर्भाधानादि संस्कार व अन्य गृह्याग्निसाध्य कर्म तसेच श्रौत यज्ञ करताच येणार नाहीत. या आचार्यांनी सुद्धा सर्व प्रकारच्या शांती एकाच ग्रंथात सांगून ठेवल्या आहेत असे नाही. पुरोहितांना वेगवेगळ्या शांती वेगवेगळ्या आचार्यांच्या ग्रंथातून मिळवाव्या लागत असतात. आता हे सर्व आचार्य काही एकाच कालखंडातील नव्हते. म्हणजेच नंतरच्या आचार्यांनी सुचविलेले प्रयोग सुद्धा शास्त्रमान्यच होते म्हणून तर अजूनही केले जात आहेत. मग आचार्यांच्या परंपरेतील,कुलातील आताच्या एकाद्या पंडितांनी केलेले ‘काळसर्प’ इ. प्रयोग अमान्य करायचे का संशोधनाची परंपरा अजूनही चालू आहे म्हणून अशा प्रयोगकर्त्यांविषयी अभिमान बाळगायचा ?

(७) ज्योतिष शास्त्रातील प्राचीन व अर्वाचीन असे आचार्य वैदिक परंपरेतून आले होते. त्यांना कर्मकांडाचेही उत्तम ज्ञान होते. त्यामुळे एकादे प्राचीन आचार्यांचे कर्मकांडासंबंधित विधान उपलब्ध नसल्यास उद्भवलेल्या प्रसंगी काय उपाययोजना करावी हे त्यांचे तेच ठरवू शकत होते. सांप्रत ज्योतिषी व पंचांगकर्ते यांपैकी वैदिक शिक्षण घेतलेले व याज्ञिकीचे तसेच धर्मशास्त्राचे सुद्धा ज्ञान असलेले असे ज्योतिषी व पंचांगकर्ते संख्येनी फारच

अल्प असल्याने ज्यांना वैदिक शिक्षण, याज्ञिकी तसेच धर्मशास्त्र यांची सांगड घालता येत नाही त्यांच्याकडूनच अशी विधाने केली जाऊ शकतात. याचा ज्योतिषी व पंचांगकर्ते यांनी अवश्य विचार करावा. परस्परांवर आरोपप्रत्यारोप, टीका, निंदा करून कोणताही धर्मोत्कर्ष साध्य होणार नाही. उलट, या दुहीचा विरोधकांना अधिक लाभ होईल व त्यातून धर्माचा व धर्मकृत्यांचाही ऱ्हासच होईल. त्यास निमित्त आपण ठरू नये एवढीच विनंती.

(८) वैद्यक विश्वात कित्येक रोगांवर अजूनही निश्चित अशी उपचार पद्धती नाही. उदा. सर्दी, नागीण, रोज नवीन उद्भवणारे रोग इ. यावर निश्चित असे औषध व उपचारपद्धती नसली ( असे वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञच सांगतात म्हणून आम्हाला माहिती, अन्यथा आम्हाला त्या विषयातील ज्ञान नाही.) तरीही डॉक्टर्स आशावादी दृष्टिकोन ठेऊन, पेशंटवर उपलब्ध ज्ञानानुसार व औषधांनुसार उपचार करतात व बहुतांश पेशंट्स रोगमुक्त होतात. " आमच्या शास्त्रात या रोगावर औषध नाही म्हणून आम्ही काही करू शकत नाही " असे म्हणून गप्प बसत नाहीत. आपल्या कक्षेत व रोग्याच्या शारीरिक मर्यादेनुसार रोग्यावर उपचार करून रोग्यापासून रोगाला दूर करणे ह्या चांगल्या उद्देशानेच प्रत्येक डॉक्टर उपचार करीत असतो. आम्हा पुरोहितांचे क्षेत्र सुद्धा ह्या डॉक्टरांच्या क्षेत्रासारखेच असते. डॉक्टर दृश्य रोगांवर,त्रासांवर उपचार करतात तर आम्हास अदृश्य रोगांवर, त्रासांवर उपचार करावे लागतात. काळसर्पाला विरोध करणाऱ्यांनी कधी अशा डॉक्टर्सना "आपण करीत असलेले उपचार वैद्यकशास्त्राच्या कोणत्या प्रमाणित ग्रंथात आहेत ? " ; " हि उपचारपद्धती किती प्राचीन आहे ; का नवीनच आहे ? " असे विचारण्याचे धाडस कधी केले आहे का ? आपल्या जनरल फिजिशियनने ताप अथवा काही दुखण्यावर त्याच्याकडील औषधे दिली तर कधीतरी आपण विचारतो का, की " डॉक्टर या गोळ्यांची नावे काय व ह्याच गोळ्या माझ्या तक्रारीवर द्याव्यात असे वैद्यकशास्त्राच्या कोणत्या प्राचीन ग्रंथानुसार आपण सांगितले ? " आपण विचारीत नाही. त्याठिकाणी मात्र डोळे झाकून (म्हणजे अंधश्रद्धाळूपणे) खरे तर डॉक्टरवर पूर्ण विश्वास ठेऊन औषधे घेतो मग पुरोहितांवर धार्मिक विधानांवरच असा संशय का ? तेव्हा, जोपर्यंत

अस्तित्वात असलेल्या प्रयोगापेक्षा जुना , शास्त्रमान्य व अधिकृत प्रयोग उपलब्ध होत नाही तोपर्यंत प्रचलित प्रयोग करणेच योग्य असे मला वाटते.

(९) नारायण नागबळी अथवा काळसर्प करून जनतेला पुरोहित फसवीत आहेत, त्यांचा कष्टाचा पैसा वाया घालवीत आहेत, संततीप्राप्ती (फलप्राप्ती) होईलच याची खात्री काय ? अशा आशयाची वाक्यरचना करून प्रश्न विचारणाऱ्यांना एवढेच विचारावेसे वाटते की, हॉस्पिटल मध्ये एकाद्या पेशंटला ॲडमिट करतेवेळी कोणताही डॉक्टर ‘ आपण प्रयत्न करू.’ असेच सांगत असतो. म्हणूनच तर शस्त्रक्रिया करण्याअगोदर जे संमतीपत्र घेतले जाते त्यात शस्त्रक्रिया करतेवेळी मृत्यू ओढविल्यास ते सुद्धा मान्य करवून घेतले जाते. वैद्यकी हे जर शास्त्र आहे तर, दाखल झालेल्या प्रत्येक पेशंटला रोगमुक्त करता आलेच पाहिजे, शस्त्रक्रियेद्वारा त्याचे प्राण वाचविलेच पाहिजेत. असे न झाल्यास त्या शास्त्रास सुद्धा शास्त्र मानायचे नाही काय ? बरे शस्त्रक्रिया केल्यानंतर रुग्ण दगावला तरीही हॉस्पिटल उपचार, औषधे, संबंधित सेवा, डॉक्टरांचे मानधन असे भले मोठ्ठे बिल (देयक) वसूल करतेच ना ? मग, फलप्राप्ती न होऊन सुद्धा यजमानांकडून दक्षिणा व अन्य खर्च (व्यय) घेणे म्हणजे लूट कशी ?

(१०) हात,पाय,पोट अथवा अन्य एकदा अवयव दुखत नसतानाही एकाद्या डॉक्टरकडे जाऊन अमुकतमुक दुखते आहे असे सांगितल्यावर एकतरी डॉक्टर ‘ तुमचा अमुकतमुक अवयव दुखणे शक्यच नाही. तुम्ही खोटे बोलत आहात.’ असे ठामपणे सांगू शकतो काय ? आम्हाला वैद्यकी (डॉक्टरी) हे शास्त्र नाही असे अजिबात म्हणायचे नाही, परंतु आलेल्या रुग्णाने सांगितलेल्या दुखण्यास सत्यकथन मानून औषधे देणे हा जर गुन्हा नसेल तर दुर्दैवाने गांजलेल्या, परिस्थितीने वैतागलेल्या अशा दुःखी मनुष्याच्या दुःख परिहारार्थ नारायण नागबळी अथवा काळसर्पशांती करणे गुन्हा कसे ठरू शकते ?

(११) “ ज्योतिषांना पत्रिका दाखविणाऱ्यांपैकी जवळपास प्रत्येकाच्याच कुंडलीत नारायण नागबळी अथवा काळसर्प योग कसा असू शकतो ?” अशी शंका सुद्धा काही श्रद्धावंतांच्या मनात येणे स्वाभाविक आहे. नित्य व्यवहारातले उदाहरण देऊन समजावितो. जेव्हा एकादा रुग्ण विशेष दुखणे उद्भविल्यास औषधोपचाराकरिता एकाद्या तज्ज्ञ डॉक्टरकडे

pankajjoshiguruji@gmail.com  संपर्क :- (022) 24311409


जातो, त्यावेळी ते डॉक्टर त्यास विचारतात की " याअगोदर काय उपचार (ट्रीटमेंट) केले आहेत ?, सध्या कोणती औषधे चालू आहेत ?" हे येथे लिहिण्यामागचा उद्देश असा की, जसे सध्याच्या शारीरिक त्रासास पूर्वीची चुकीची कृत्ये सुद्धा कारणीभूत असू शकतात व त्या चुका अभ्यासूनच डॉक्टरला त्यावर उपचार करावे लागतात. ज्योतिषांकडे येणाऱ्या व्यक्तीस जेव्हा त्यांच्या धर्मकृत्यांबद्दल विचारले जाते तेव्हा, देवांची उपासना तर उत्तम चालू असते परंतु पितरांकरिता श्राद्धादि कृत्ये मात्र अजिबात होत नसल्याचे जाणवते. शक्यतो आधी सहजसोपे उपाय करून दोष दूर होत आहेत का ते पहिले जाते परंतु, तसे न झाल्यास नारायण नागबळी अथवा काळसर्पासारख्या 'ऑपरेशन' शिवाय पर्याय नसतो. हल्ली कित्येक लोकांची 'ॲन्जिओप्लास्टी', 'ॲन्जिओग्राफी' इ. झाल्याचे वरचेवर ऐकू येते. आपले फॅमिली फिजिशियन आपल्याला " वर्षातून एकदा तरी संपूर्ण आरोग्य तपासणी करून घ्या " असे सांगतात. त्यात त्यांचा लाभ असेल किंवा नसेल पण आपला लाभ त्यापेक्षा निश्चित अधिक असतो. मलेरिया सारखे ज्वर एकाच व्यक्तीला पुन्हापुन्हा होऊ शकतात. तेव्हा कुणी असे म्हणत नाही की हे मलेरियाचे खूळ डॉक्टरांनी पसरविलेले आहे. अहो, जो त्रास व्यक्ती सतत अनुभवत असते त्यास खूळ म्हणणे म्हणजे अज्ञान तर आहेच पण चेष्टा सुद्धा आहे. पैतृक पीडांचा त्रास ज्यांना होत असतो ते काय आमच्यासमोर खोटे बोलत असतात असे म्हणायचे काय ? मी पुन्हापुन्हा सांगतो की, आमचा डॉक्टरांवर अजिबात राग अथवा संशय नाही पण 'वैज्ञानिक' दृष्टी असणाऱ्यांनी कधीतरी अशा शस्त्रक्रियांना थोतांड म्हटल्याचे ऐकिवात नाही. जो दोष दिसतो आहे त्यावर उपाय करणे म्हणजे थोतांड कसे ?

(१२) जकातदारांच्या या विधानाअगोदर (२००५-२००६ वर्षाच्या) शके १९२७ च्या कालनिर्णय पंचांगात ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकरांनी 'भयंकर वाटणारा पण निराधार-निष्फळ कालसर्प योग' असा लेख लिहून हेच मत प्रकट केले होते. त्यात ६ व्या मुद्द्यात " राहू-केतूच्या मध्ये चंद्रासह सर्व ग्रह जेव्हा येतात तेव्हा तशी ग्रहस्थिती १५ दिवस टिकते. म्हणून त्या १५ दिवसात जन्माला येणाऱ्या सर्व जणांना त्याचे अनिष्ट फल मिळणे अशास्त्रीय आहे." असे एक मत जळगावचे श्री.पंढरीनाथ शास्त्री व पुण्याचे प्रख्यात ज्योतिषी श्री. व.दा.

भट यांचे म्हणून छापले आहे. साळगावकर स्वतः ज्योतिर्भास्कर होते तरीही ‘ राहू-केतूच्या मध्ये चंद्रासह सर्व ग्रह जेव्हा येतात तेव्हा तशी ग्रहस्थिती १५ दिवस टिकते ’ हे सांगण्याकरिता त्यांना श्री.पंढरीनाथ शास्त्री व श्री. व.दा. भट यांचे नाव पुढे का करावे लागते हे न समजण्यासारखे आहे. व ‘१५ दिवसात जन्माला येणाऱ्या सर्व जणांना त्याचे अनिष्ट फल मिळणे अशास्त्रीय आहे.’ हे जर मान्य करायचे तर एकाच दिवशी जन्मणाऱ्या बहुतेक सर्व बालकांना जन्मनक्षत्र एकच असल्यामुळे नक्षत्राचे अनिष्ट फल परिहारार्थ मूळ,आश्लेषा,ज्येष्ठा इ. तसेच एकाच दिवशी व एकाच तिथीवर जन्मलेल्या बालकांना तिथीचे अनिष्ट फल परिहारार्थ कृष्ण चतुर्दशी, अमावास्या,कुहू,सिनीवाली,क्षयतिथी इ. जननशांती कराव्या लागणे तरी यांना मान्य कसे होते ? ते अशास्त्रीय का नाही वाटत ? न्याय लावायचा तर तो समान लावला पाहिजे. पंचांगात शेवटी ‘जननशांतीचे तिथी-नक्षत्र-योगादि’ अशा विषयांतर्गत जननशांती तर आपणास मान्य आहेत. म्हणजेच एकाच दिवशी जन्मलेल्या सर्व बालकांना तिथी,नक्षत्र,योग इ. समान असल्यामुळे त्रास होऊ शकतात हे साळगावकर प्रभृतींना मान्य आहे मग १५ दिवसात जन्मलेल्यांना सुद्धा त्रास होऊ शकतात हे का मान्य होत नाही ? एकाच दिवशी जन्मलेल्या (कधीकधी दोन दिवसात जन्मलेल्यांची सुद्धा) सर्वांची एकच राशी व राशीभविष्य अशास्त्रीय का नाही वाटत ? एकाच दिवशी जन्मलेल्या अथवा एकाच तिथी, नक्षत्र, योग, करण असणाऱ्या सर्वांना समान प्रमाणात लाभ-हानी होईल का नाही याचा विचार अगदी व्यावहारिक स्तरावर करता येणे शक्य आहे. एकाच शाळेच्या एकाच वर्गात एकच शिक्षक ६०-७० विद्यार्थ्यांना शिकवितो हे तर आपल्याला माहिती असेलच. शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना समान शिकवितात मग, वार्षिक परीक्षा झाल्यावर निकालाचे वेळी कुणाला कमी गुण तर कुणाला जास्त गुण कसे मिळतात ? शिक्षकाने एकाच वेळी सर्व विद्यार्थ्यांना शिकविलेले शिक्षण म्हणजे एकाच दिवशी जन्मलेल्या मुलांची असलेली एकच कुंडली समजा आणि मग विचार करू लागा. केवळ शिक्षक शिकवितो त्यावर अवलंबून असणारे काही विद्यार्थी असतात, काही स्वतःचा अधिक अभ्यास करणारे विद्यार्थी असतात, काही अन्यत्र शिकवणी लावून शिकणारे असतात ( काही कॉपीचा अभ्यास करणारे असतात तर काही पैसे

देऊन उत्तीर्ण होणारेही असतात त्यात काही पकडले जातात, वर्ष वाया जाते, काही सुटतात.)अशा विविध घटकांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणात तफावत दिसते. तसेच समान ग्रहस्थिती असली तरीही आर्थिक,सामाजिक भेदामुळे प्रत्येकास भोगाव्या लागणाऱ्या सुखदुःखाच्या दर्जातही फरक असतो एवढेच लक्षात ठेवावे. १० व्या मुद्द्यात " काळ व सर्प ह्या दोन स्वतंत्र देवता असताना काळसर्प हि एकच देवता मानणे चुकीचे आहे." असे साळगावकर म्हणतात. यासंबंधी विचार मागील लेखात झाला आहे. काळसर्प शब्दांनी काळ व सर्प हि दोन भिन्न पदे दाखविली जातात म्हणून त्या दोन भिन्न देवता आहेत असा एक अर्थ निघू शकतो हे खरे; पण एवढा एकच अर्थ निघत नाही हे सुद्धा तितकेच खरे. दोन भिन्न शब्द प्रत्येक वेळी स्वतंत्रपणेच योजिले जातात असे नसून कित्येकदा अगोदरचा शब्द नंतरच्या शब्दाचे विशेषण असते. (वैयाकरण्यांच्या परिभाषेत यास 'उपमान' असे म्हटले जाते. **'उपमानानि सामान्यवचनैः'** असे पाणिनींचे २-१-५५ वे सूत्र आहे. याचे उदाहरण म्हणजे घनश्याम = घन इव श्याम = मेघाप्रमाणे सावळा,काळा असे शिकविले जाते. ) या ठिकाणी सांगायचे तर काल अथवा काळ हे सर्पाचे विशेषण आहे.(काल या शब्दाचे अमरकोशानुसार तीन अर्थ निघतात. यम, वेळ व काळा. कोणता अर्थ समजायचा हे विषय व संदर्भानुसार ठरवावे लागते. ) जसे काळरात्र, काळभैरव, कालपुरुष इ. हे व्याकरणाचा अभ्यास असल्याशिवाय केवळ ज्योतिषाचा अभ्यास केलेल्यास समजणार नाही. (नरसिंह म्हणजे नर व सिंह असा अर्थ केला जात नाही, तर नररुपात असलेला सिंहच असा केला जातो तसेच जनताजनार्दन म्हणजे जनता व जनार्दन असा अर्थ केला जात नाही तर जनतेच्या रुपात असलेला जनार्दन म्हणजे देव असा अर्थ केला जातो. ज्योतिष शिकताना प्रारंभीच 'कालपुरुषाची कुंडली' असा एक विषय असतो. काळसर्प ह्या दोन देवता आहेत असे मानणारे साळगावकरप्रभृति ज्योतिषी अशा वेळी कालाची व पुरुषाची अशा दोन कुंडल्या घेऊन बसत होते काय हे आम्हास माहिती नाही ?

(१३) प्रत्येक डॉक्टरने दिलेले औषध प्रत्येक रुग्णास लागू पडतेच असे नाही, डॉक्टरांमध्ये सुद्धा ॲलोपॅथी, होमिओपॅथी, आयुर्वेदिक अशा शाखा आहेतच. एकाची सर्वच

pankajjoshiguruji@gmail.com  संपर्क :- (022) 24311409

मते दुसऱ्या शाखेस मान्य असतील असे नाही. म्हणून या शास्त्रांना थोतांड म्हणण्याचे व त्यानुसार औषधे देणाऱ्यास गुन्हेगार म्हणण्याचे धाडस कुणी करत नाही.

(१४) अन्य कोणते योग मानीत असो वा नसो, ज्योतिषी 'कर्तरी' योग तरी मानतात ना ? मग राहू आणि केतू या दोन पापग्रहांच्या कर्तरीत म्हणजे कात्रीत अन्य ग्रह सापडले तर या योगामुळे अन्य ग्रहांचे फल अपेक्षेएवढे मिळणार नाही , त्यात न्यून राहील हे तर नक्की ? मग अशा कात्रीच्या दोन धारधार पात्यांना म्हणजे राहू व केतूला प्रसन्न करून घेण्याकरिता जर जपहोमात्मक शांती केली तर त्यात अशास्त्रीय ते काय ? राहिला प्रश्न सर्प कोठून आला ? तर, या राहू व केतू मधील स्थानातून जे ग्रह शिल्लक असतात त्यांना शेष असे म्हटले जाते. संस्कृतात शेष शब्दाचे दोन अर्थ आहेत. सर्प व शिल्लक. राहू व केतू हे पूर्ण शरीराचे नसून अर्धवट असल्याने शेष ग्रहांची अनुकूलता असावी म्हणून या शांतीची मुख्य देवता 'शेष' अथवा सर्प. ह्या सर्पाचेच विशेषण काळ. कालसर्पाचा शब्दशः अर्थ कालरूपी सर्प. जसे कालभैरव, काळरात्र, काळपुरुष इ. म्हणून शांतीचे अथवा विधानाचे नाव 'काळसर्प शांती'. दुसऱ्या एका प्रचलित प्रयोगात तर राहू व केतू यांना या शांतीत बोलाविलेलेच नाही. भुजंगेश म्हणजेच सर्प व द्वादश म्हणजे बारा नाग यांचेच आवाहन स्थापन, पूजन व त्यांच्याकरिता हवन केले जाते.

(१५) आधुनिक खगोलशास्त्रज्ञ राहू-केतू हे ग्रह नाहीतच असे सांगतात. त्यांचे म्हणणे त्यांच्या खगोलशास्त्रातील परिभाषेनुसार योग्य असेलही, पण ग्रह हा शब्द संस्कृत असल्याने त्याचा अर्थ समजण्यास संस्कृत व्युत्पत्तिशास्त्रच वापरले पाहिजे. त्यानुसार ज्योतिषशास्त्रात ग्रह याचा अर्थ इंग्रजीतील 'planet' प्रमाणे नसून 'गृण्हाति गतिविशेषान् इति' म्हणजे विशिष्ट गतींचे ग्रहण करणारे किंवा 'गृण्हाति फलदातृत्वेन जीवान् इति' म्हणजे शुभाशुभ फल देण्याच्या रूपाने जीवांचे ग्रहण करणारे (जीवांना पकडणारे) ते ग्रह अशा अर्थाने आहे. 'माझ्याविषयी चुकीचा ग्रह करून घेऊ नकोस' असे भाषेत म्हटले जाते. लहान मुलांना त्रास देणाऱ्या शक्तींना सुद्धा बालग्रह असे म्हटले आहे. या दुसऱ्या व्युत्पत्तीनुसार राहू व केतू या शक्तींना सुद्धा ग्रह अशी संज्ञा देता येते.

पंकज राजेंद्र जोशी.

pankajjoshiguruji@gmail.com  संपर्क :- (022) 24311409

(१६)        काम्य नारायण नागबली केव्हा करावा लागतो ? तर मागील लेखात सांगितलेल्या दुर्मरणाच्यापैकी एकाद्या कारणाने कुलातील कुणाचा मृत्यू झाला असेल व त्यावेळी अज्ञानाने वा अश्रद्धेने हा विधी केला गेला नसेल तर हा विधी न करता सपिंडन केल्याने उद्भविणारे त्रास हे २-३ पिढ्यांनंतर जाणवू शकतात. कुलपुरोहित अथवा अंत्येष्टी करणारे पुरोहित सांगतात तेव्हा जर ऐकले नाही तर कालांतराने त्रास जाणवू लागल्यावर ज्योतिष्याने सांगितल्यावर मगच नारायण नागबली करण्याची प्रवृत्ति सांप्रत बऱ्याच सुसंस्कृत व उच्चशिक्षितांमध्येसुद्धा  सुद्धा दिसून येते. एकेकाळी (७०-८० वर्षांपूर्वी) श्राद्धपक्ष नियमित प्रतिवर्ष केले जात असत. त्यामुळे पितर असंतुष्ट राहण्याची शक्यता फारच कमी असे म्हणूनच त्र्यंबकेश्वरी नारायण नागबली सुद्धा सध्याच्या एवढ्या संख्येनी होत नव्हते. बदलत्या कालानुसार श्राद्धपक्ष करणाऱ्यांचे प्रमाण जसे कमीकमी होऊ लागले तसेतसे अतृप्त पितरांची संख्या व  त्रासही वाढू लागले. परिणामी, त्र्यंबकेश्वरी नारायण नागबली अधिक प्रमाणात होऊ लागले. ( **गेल्या ५० वर्षात रेल्वेलोकल्स, खाजगी गाड्या किती वाढल्या ? बांधकाम, इमारती किती वाढल्या ?, चहा साखरेचे दर किती वाढले ? सोन्याचे दर किती वाढले ? ते ह्या विचारवंतांना दिसत नाही. ५० वर्षात नारायण नागबली काळसर्प शांती करणारे लोक वाढले एवढे मात्र बरोब्बर दिसते.  ह्यांच्या दुर्बिणी आकाशाकडे तोंड करून असतात का त्र्यंबकेश्वरकडे ?** ) भगवद्गीतेत अर्जुनाच्या मुखी  ‘ पतन्ति पितरोह्येषां लुप्तपिंडोदकक्रियाः । ’ व ‘उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन । नरके ऽ नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥’ या श्लोकांमधून ‘आपल्या हव्यकव्यात्मक कुलधर्माचा त्याग करू नये व केल्यास अनिश्चित काळापर्यंत नरकात पडावे लागते.’ असेच व्यासांनी सांगितले आहे. अंत्यसंस्काराचे वेळीच हा विधी केला असता तर त्रास खूपच कमी भोगावे लागले असते परंतु, बहुकालपर्यंत पितरांना अपेक्षित कव्यकार्य न केल्याने आता शारीरिक, आर्थिक, मानसिक, कौटुंबिक असे बरेच त्रास भोगावे लागणे साहजिकच आहे. वेळच्यावेळी देणे पूर्ण न केल्यास मुद्दलापेक्षा व्याजाची रक्कमच जास्त होते व त्याचा मनस्ताप जास्त होतो.

(१७)	प्राचीन तेवढेच मान्य करायचे असे ठरविले तर, वेदामध्ये श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण, गीता, ज्ञानेश्वरी इ. नसल्यामुळे त्यांना सुद्धा अमान्य ठरविणारे निर्माण होऊ लागतील. त्यांच्या सांगण्यानुसार यज्ञयाग करायचे तर वेदांमध्ये उल्लेख नसलेल्या देवतांकरिता केलेले कोणतेही यज्ञयाग अशास्त्रीयच ठरणार. तेव्हा, प्राचीनत्व हा एकच निकष योग्य नव्हे, एवढेच सांगणे.

(१८)	प्रायः सर्वच शास्त्रीय ग्रंथांच्या प्रारंभी 'परिभाषा' (terminology) सांगितलेली असते. या ग्रंथातील विषयात विशिष्ट शब्दाचा अर्थ काय समजावा ? परिमाण काय असावे ? अशा सूत्रांचा त्यात समावेश असतो. उदा. ऋग्वेदीय ब्रह्मकर्म समुच्चयात ' व्रतोद्यापन प्रकरणात 'व्रतोद्यापनविधिः' व 'व्रतोद्यापनहोमः' या विषयाचे प्रयोजन काय ? असे विचाराल तर, 'ज्या ज्या व्रतांचा व उद्यापनाचा विधी ऋग्वेदीय ब्रह्मकर्म समुच्चयात दिला आहे ती करण्याचा प्रकार' हा तर आहेच परंतु, जी व्रते दिली नाहीत ती व्रते करण्याचे वेळी व उद्यापन करतेवेळी शास्त्रीय कर्म कसे असावे ? याविषयी दिग्दर्शन हे या विषयाचे प्रयोजन आहे. ऋग्वेदीय ब्रह्मकर्म समुच्चयात सांगितली आहेत तेवढीच व्रते करावीत, याखेरीज व्रते करू नयेत असे काही ऋग्वेदीय ब्रह्मकर्म समुच्चयकारांचे सांगणे नाही. मग ज्या व्रताचा उल्लेख ऋग्वेदीय ब्रह्मकर्म समुच्चयात नसेल ते करण्याचा प्रसंग उद्भवल्यास अडचण येऊ नये याकरिताच 'व्रतोद्यापनविधिः' व 'व्रतोद्यापनहोमः' ही या व्रत विषयाची 'प्रकृति' सांगून ठेवली आहे त्यानुसार देवता, काळ, द्रव्य, उपचार इ. भेदाने अनुल्लिखित पण शास्त्रमान्य व्रत व उद्यापन सुद्धा करता येऊ शकते. प्रयोगरत्न म्हणजेच नारायणभट्टीत सुद्धा अशीच परिभाषा सांगून ठेवली आहे. त्यातसुद्धा सकलकर्मसाधारणपरिभाषा हा विषय पान ४७ वर आहेच. 'प्रयोगात जेथे हवनीय द्रव्य स्पष्टपणे सांगितले नसेल तेव्हा आज्य म्हणजे तूप हे हवनीयद्रव्य आहे असे समजावे.' अशा अर्थाची वचने आहेत. विशेषत्वाने सांगितले नसल्यास कर्ता कोण, दिशा कोणती, मंत्र उपलब्ध नसल्यास काय करावे इ.चे मार्गदर्शन त्यात केलेले आहे. या ग्रंथातील प्रयोगांशिवाय अन्य प्रयोग करणे जर अशास्त्रीय असते तर अशी वचने परिभाषेत घालण्याचे प्रयोजनच नव्हते.

(१९) या कार्यक्रमाचे वेळी श्री. सोमण व श्री. जकातदार यांच्या वाचास्थानात कोणते राजकीय ग्रह होते का ? अथवा त्यास्थानावर , स्थानीवर वर दृष्टी टाकत होते हा ज्योतिषांनी सुद्धा अभ्यासण्यासारखा विषय आहे. मंदिरांचे सरकारीकरण करून भक्तांनी देवाला अर्पण केलेला पैसा यांना पुरेनासा होऊ लागला म्हणून आता पुरोहितांवर राजकीय ग्रहांची दृष्टी पडू लागली आहे की काय ?

(२०) 'नारायणसर्प' या विधीकरिता ( म्हणजे नारायण नागबली काळसर्प असे ' झी २४ तास' ला म्हणायचे आहे. पहिला एक शब्द नारायण व शेवटचा एक शब्द सर्प जोडून शॉर्टकट नारायणसर्प. आहे की नाही 'रोखठोक' ? ) साडेचार हजार रुपयांचा खर्च येतो असे झी २४ तास चे म्हणणे आहे. त्र्यंबकेश्वरच्या पुरोहितांनी जर यापेक्षा जास्त खर्च सांगितला तर ज्यांना हा विधी करायचा आहे त्यांनी झी २४ तास ला फोन करून विचारायचे का ? साडेचार हजारात कोणते पुरोहित हा विधी करून देतात ? त्यांचे नाव व संपर्क क्रमांक सांगाल का ? व 'झी २४ तास' ने एकाद्या पुरोहिताचे नाव सांगितलेच तर त्या पुरोहिताचे व झी २४ तास चे 'रोखठोक' संबंध नसतील कशावरून ? दुसरे म्हणजे त्र्यंबकेश्वरच्या पुरोहितांनी जर यापेक्षा कमी खर्च सांगितला तर हि कुणाची ' कट प्रॅक्टिस ' समजायची ? रोज ५० विधी होतात. मग ५० × ४५०० = २,२५,००० अशी गणिते कधीतरी एकाद्या हॉस्पिटल व डॉक्टर करिता केली आहेत का ? चित्रपट अथवा नायकाकरिता केली आहेत का ? ( आम्ही कोणत्याही डॉक्टरच्या, नायकाच्या, हॉस्पिटलच्या, चित्रपटाच्या विरोधात नाही ) बरे, हे ५०× ४५०० रुपये सर्वच्या सर्व प्रत्येक पुरोहिताला मिळतात असे ह्यांना वाटते काय ? विधी ४५०० रुपयात करायचे ?, का कमी खर्चात करायचे ?, का जास्त खर्चात हे त्र्यंबकेश्वरचे पुरोहित यजमानाच्या तारतम्याने ठरवतील. त्याकरिता झी २४ तास च्या कुणा 'लुडबुडकरांची' गरज नाही.

(२१) ज्यांना हि काळसर्प शांती केल्यामुळे अपेक्षित व इष्टफल मिळाले असा वर्ग संख्येनी खूपच मोठ्ठा आहे. कर्माचे फल मिळणे हा अनेक घटकांचा एकत्रित परिणाम आहे. व्रताचे प्राचीनत्व अथवा अर्वाचीनत्व ( आधुनिकत्व) या एकाच घटकावर फलप्राप्ती अवलंबून नाही हे लक्ष्यात ठेवावे.

pankajjoshiguruji@gmail.com  संपर्क :- (022) 24311409

(२२) पीठाधिष्ठित विद्यमान शंकराचार्यांनी याबाबत शास्त्रमत प्रसिद्ध केल्यास तो त्यांच्या पदाचा व अधिकाराचा सदुपयोग ठरेल.

(२३) वाहिन्यांना काही पुरोहितांच्या गैरवर्तनावर आक्षेप असेल, विधींकरिता होणाऱ्या व्ययाबाबत (खर्चाबाबत) आक्षेप असतील, विधींसंबंधित गैरसोयी बद्दल आक्षेप असल्यास अथवा अन्य काही आक्षेप असल्यास तेवढाच विषय चर्चेस घ्यावा. सरसकट ‘धर्मकृत्यास थोतांड’ म्हणू नये.

(२४) लेखाचा सारांश काय तर, नोंद करण्याच्या पद्धतीमधील त्रुटींमुळे समजा फार जुने संदर्भ उपलब्ध न झाल्यास, जरी ‘ हे विधान त्र्यंबकेश्वर, वाराणसी, गोकर्ण महाबळेश्वर (कर्नाटक) अथवा अन्य क्षेत्रातील विद्वानांनी तयार केले असावे अशा तर्कास ६०-७० वर्षांपूर्वीचा इतिहास नाही ’ असे जरी लक्ष्यात आले तरी त्यामुळे विधानाची उपयुक्तता व शास्त्रप्रामाण्य अजिबात कमी होत नाही. हे मत सनातन मते मान्य असणाऱ्या माझ्यासारख्याला मान्य होऊ शकते, तर स्वतःस सुधारक समजणाऱ्या आधुनिकांना अमान्य का ?

(२५) विषयाचा समारोप करताना विदुरनीतीतील एका वचनाचे प्रकर्षाने स्मरण झाले.

**वितथं तु वदेयुर्ये धर्मं प्रल्हाद पृच्छते । इष्टापूर्तं च ते घ्नन्ति सप्तसप्त परावरान् ।।**

<u>महाभारत – सभापर्व - अध्याय ६८ – श्लोक ८० वा = सातवळेकर प्रत</u>

( हे प्रल्हादा ! जे लोक धर्मविषयक प्रश्न विचारणाऱ्यांना खोटी उत्तरे देतात ते आपल्या अगोदरच्या सात पिढ्यांकडून झालेल्या व पुढच्या सात पिढ्यांकडून होणाऱ्या इष्टापूर्त म्हणजे काम्य व आवश्यक कर्मरूपी धर्माचा नाश करतात.)

वाहिन्यांनी व विशेषतः धर्मसंबंधित चर्चेत सहभागी होणाऱ्या सर्वांनीच हे लक्ष्यात ठेवावे.

धन्यवाद !

pankajjoshiguruji@gmail.com  संपर्क :- (022) 24311409

**(विशेषतः पुरोहितांकरिता :- दिवसेंदिवस धार्मिक कार्यांवर असले आक्षेप व त्यांचे विडंबन जर वाढत असेल तर आपणही अशा आक्षेपांचे खंडन करण्यास तयार असले पाहिजे. संघटित राहून हे कार्य केल्यास त्यास अधिक बळ प्राप्त होईल. 'हे आमचे काम नाही'; ' हा आमचा विषय नाही' असे म्हणू नका. प्रत्येकाकडे एकतरी विशेष शक्ती नक्की आहे. त्याचा स्वधर्मरक्षणाकरिता सदुपयोग करणे हे प्रत्येकाने स्वतःचे धर्म्य कर्तव्य समजले पाहिजे. पुरोहित . ज्योतिषी, संस्कृततज्ज्ञ, वास्तुतज्ज्ञ, शास्त्री, पंडित व पुरोहित यांच्यात परस्पर समन्वय असल्यास एकजुटीने प्रतिकार करणे सहज शक्य आहे. तेव्हा, केवळ कामाकरिताच नव्हे तर 'धर्माकरिता सुद्धा संघटित रहा' एवढीच विनंती .)**

पंकज रामचंद्र जोशी

pankajjoshiguruji@gmail.com  संपर्क :- (022) 24311409